महाराष्ट्र शासन

मराठी भाषा विभाग

# भाषा संचालनालय, मुंबई

**"राजभाषा मराठी - अभिजात भाषा मराठी"**

अभिजात मराठी भाषेविषयी नवीन पिढीमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, अभिजात मराठी भाषेचा उद्गम व विकास, तिच्यामधील साहित्यिक व वांग्मय परंपरा, तिचे स्वरूप व वैशिष्ट्ये, मराठी भाषेचे अभिजातत्त्व अभिव्यक्त करणारे शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखिते, इत्यादीसारखी ऐतिहासिक साधने यांचे ज्ञान व माहिती मिळावी यासाठी, या ऐतिहासिक साधनांचे व संदर्भाचे सर्वेक्षण, जतन व संवर्धन करण्यासाठी आणि त्यांचा प्रचार व प्रसार होण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करण्याकरिता ऑनलाइन प्रशिक्षण मॉड्युल्स तयार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

संचालनालयामार्फत "विद्यार्थी व शिक्षकांसाठी ऑनलाईन मार्गदर्शन व प्रशिक्षण ई-लर्निंग मॉड्युल्स" विकसित करण्यासाठी तसेच खुल्या बाजारातून नामांकित आणि अनुभवी संस्थांकडून, सॉफ्टवेअर कंपन्यांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रके सादर करताना, संस्थेने किंवा सॉफ्टवेअर कंपन्यांनी पुढील महत्त्वाच्या नमूद केलेल्या सूचना तसेच खाली केल्याप्रमाणे "प्रमाण विनिर्देश" (Standard Specifications) यांच्या अनुषंगाने बंद पाकीटात दरपत्रके सादर करावी. त्यांच्या एकूण क्षमता व अनुभव नमूद करून सदर दरपत्रके या कार्यालयास दिनांक १९.०३.२०२६ वेळ ११.५९ (रात्री) पर्यंत पाठवावी.

## कामाचे स्वरूप:

१. भाषा संचालनालय, मुंबई या कार्यालयाच्यावतीने राज्यात मराठी भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याच्या अनुषंगाने शालेय स्तरावर प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षण मॉड्युल्स तयार करून घेणे आवश्यक आहे. अभिजात मराठी भाषेविषयी नवीन पिढीमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, अभिजात मराठी भाषेचा उद्गम व विकास, तिच्यामधील साहित्यिक व वाङ्मय परंपरा, तिचे स्वरूप व वैशिष्ट्ये, मराठी भाषेचे अभिजातत्त्व अभिव्यक्त करणारे शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखिते, इत्यादीसारखी ऐतिहासिक साधने यांचे ज्ञान व माहिती मिळावी यासाठी, या ऐतिहासिक साधनांचे व संदर्भाचे सर्वेक्षण, जतन व संवर्धन करण्यासाठी आणि त्यांचा प्रचार व प्रसार होण्यासाठी विद्यार्थी व शिक्षकांना मार्गदर्शन करण्याकरिता ऑनलाइन प्रशिक्षण मॉड्युल्स तयार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

२. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ तसेच स्थानिक प्राधिकरणे अधिनियम, २०२२ याखाली केलेल्या तरतुदींची आणि नियमांची महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांमध्ये व निमशासकीय कार्यालयांमध्ये आणि सर्व स्थानिक प्राधिकरणांमध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता तसेच या कायद्यांची जनतेला तसेच विभागांना व शासकीय कार्यालयांना स्थानिक प्राधिकरणांना, त्यांच्या विभाग प्रमुखांना व कार्यालय प्रमुखांना आणि मराठी भाषा अधिकाऱ्यांना या कायद्यांची व तरतुदींची ओळख व परिचय व्हावा तसेच कायद्यांखालील त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या आणि अधिकार यांची माहिती व्हावी या दृष्टीने, ऑनलाइन प्रशिक्षण देण्याकरिता प्रशिक्षण तयार करून घेणे आवश्यक आहे.

संचालनालयामार्फत विद्यार्थी व शिक्षकांसाठी ऑनलाईन मार्गदर्शन व प्रशिक्षण ई-लर्निंग मॉड्युल्स विकसित करण्यासाठी आणि महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ तसेच स्थानिक प्राधिकरणे अधिनियम, २०२२ याखाली केलेल्या तरतुदींची आणि नियमांची महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांमध्ये व निमशासकीय कार्यालयांमध्ये आणि सर्व स्थानिक प्राधिकरणांमध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता मॉड्युल्स विकसित करण्यासाठी खुल्या बाजारातून नामांकित आणि अनुभवी संस्थांकडून, सॉफ्टवेअर **कंपन्यांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रके सादर करताना, संस्थेने किंवा सॉफ्टवेअर कंपन्यांनी १. मराठी** भाषेचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्याच्या अनुषंगाने शालेय स्तरावर प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांसाठी प्रशिक्षण मॉड्युल्स तयार करणे आणि **२. महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांमध्ये व निमशासकीय कार्यालयांमध्ये आणि सर्व स्थानिक प्राधिकरणांमध्ये अधिनियमाच्या तरतुदींची आणि नियमांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता मॉड्युल्स तयार करणे या दोन स्वतंत्र कामांसाठी प्रत्येकी पाच मॉड्युल्स विकसित करण्यासाठी** पुढील महत्त्वाच्या नमूद केलेल्या सूचना तसेच "प्रमाण विनिर्देश" (Standard Specifications) यांच्या अनुषंगाने बंद पाकीटात दरपत्रके सादर करावी. संस्थेचा एकूण अनुभव व क्षमता नमूद करून सदर दरपत्रके या कार्यालयास दिनांक १९.०३.२०२६ वेळ ११.५९ (रात्री) पर्यंत पाठवावी.

## कामाचे स्वरूप:

- विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी उपयुक्त अशा शैक्षणिक व प्रशासकीय मराठी भाषा मार्गदर्शनपर ऑनलाईन आणि ऑफलाईन मॉड्युल्सची निर्मिती करणे.
- महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ तसेच स्थानिक प्राधिकरणे अधिनियम, २०२२ याखाली केलेल्या तरतुदींची आणि नियमांची महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागांमध्ये व निमशासकीय कार्यालयांमध्ये आणि सर्व स्थानिक प्राधिकरणांमध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता मॉड्युल्स विकसित करणे.
- उच्च दर्जाचे ऑडिओ, व्हिडिओ आणि ग्राफिक्स यांचा समावेश असावा.
- मजकुराचे संपादन, डबिंग आणि तांत्रिक सॉफ्टवेअर विकसित करणे.
- अभिजात मराठी भाषेचा उद्गम, विकास आणि वैशिष्ट्ये यावर आधारित मॉड्युल्स तयार करणे.
- शिलालेख, ताम्रपट, हस्तलिखिते यांसारख्या ऐतिहासिक साधनांचे चित्रीकरण व सादरीकरण.
- नवीन पिढीमध्ये भाषेविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी शैक्षणिक साहित्य विकसित करणे.
- विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी मार्गदर्शनपर ऑनलाइन प्लॅटफॉर्मसाठी आशयाची निर्मिती करणे.
- राज्यातील प्रशासनात मराठी भाषेचा प्रभावीपणे वापर करण्यासाठी मराठी भाषा अधिकाऱ्यांना सहाय्य करण्यासाठी मॉडेलची निर्मिती करणे.

## निविदेचे वेळापत्रक:

- निविदा प्रसिद्धीचा दिनांक :- १७.०३.२०२६
- निविदा संच डाऊनलोड करण्याचा कालावधी दिनांक १७.०३.२०२६ ते दिनांक १९.०३.२०२६
- निविदा सादर करण्याचा अंतिम दिनांक : दिनांक १९.०३.२०२६ दिनांक, वेळ: ११.५९ (रात्री)
- निविदा उघड करण्याचा दिनांक :- २०.०३.२०२६, वेळ: सकाळी ११.०० वाजता
- पात्रता निकष : संस्था नोंदणीकृत असावी आणि गेल्या ३ वर्षांत मॉड्युल्स तयार करणे, शैक्षणिक सॉफ्टवेअर किंवा ई-लर्निंग क्षेत्रात कामाचा अनुभव.
- संस्थेकडे मराठी भाषेतील मजकूर निर्मितीसाठी तज्ज्ञ मनुष्यबळ उपलब्ध असावे.

## अटी व शर्ती :-

- कोणतीही निविदा स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य यांनी राखून ठेवला आहे.
- मॉड्युल्स हे आंतरराष्ट्रीय मानकांनुसार असावेत जेणेकरून ते कोणत्याही लर्निंग मॅनेजमेंट सिस्टमवर चालतील. ते अत्यंत सुलभ असावे.
- तयार केलेल्या सर्व साहित्याचे स्वामित्व हक्क केवळ भाषा संचालनालयाकडे राहतील.
- तपशीलात नमूद केल्याप्रमाणे हा करार सेवासंविदा पद्धतीने करण्यात येईल.
- खर्चाची रक्कम विहित कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर आपणास प्रदान करण्यात येईल.
- कामासंबंधी कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास त्या तक्रारीचे निवारण करणे बंधनकारक राहील.
- कराराच्या कालावधीत अपूर्ण राहिलेली कामे तद्नंतर पूर्ण करून देणे बंधनकारक राहील.
- या कामाचा पूर्व अनुभव असलेल्या व यशस्वीपणे काम केलेल्या सेवा पुरवठादार संस्थेस प्राधान्य देण्यात येईल.

**भाषा संचालक**

**महाराष्ट्र राज्य**